दिनांक ०६/०१/२०२५

**:: प्रेस नोट ::**

दिनांक १२/१०/२०२४ रोजी निर्मलनगर पोलीस ठाण्याचे स्थलसिमेत बांद्रा (पुर्व), मुंबई येथे माजी राज्यमंत्री झियाउद्दीन अब्दुल रहिम सिध्दीकी उर्फ बाबा सिध्दीकी यांची गोळीबार करुन हत्या करण्यात आली होती. सदर गोळीबाराच्या घटनेबाबत निर्मलनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे नोंद, गु.र.क्र. ५८९/२०२४ या गुन्हयाचा पुढील तपास गुन्हेशाखा, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला होता. गुन्हे शाखा, मुंबई यांचेमार्फत सदर गुन्हा, गु.प्र.शा., गु.र.क्र. ८६/२०२४ अन्वये पुर्ननोंद करुन करण्यात आलेल्या तपासामध्ये अदयाप पर्यंत एकूण २६ आरोपींना भारतातील विविध राज्यांमधुन अटक करण्यात आली असुन तीन आरोपीतांना पाहिजे आरोपी म्हणुन जाहिर करण्यात आले आहे. त्यांची नावे अनुक्रमे (१) मोहम्मद यासिन अख्तर उर्फ सिकंदर उर्फ मोहम्मद जमील उर्फ जिशान अख्तर उर्फ मोहम्मद जसीन उर्फ अख्तर उर्फ जुल्मी उर्फ केही उर्फ जस्सी, (२) शुभम रामेश्वर लोणकर उर्फ शुब्बु, (३) अनमोल लविंदरसिंग बिश्नोई उर्फ भानु उर्फ भाईजी उर्फ एबी भाई अशी आहेत.

नमूद गुन्हा हा पाहिजे आरोपी अनमोल लविंदरसिंग बिश्नोई याच्या निर्देशावरुन त्याच्या संघटीत गुन्हेगारी टोळीचे सदस्य असलेल्या अटक व पाहिजे आरोपी यांनी एकत्रितपणे कट रचून त्यांच्या संघटीत गुन्हेगारी टोळीची दहशत व वर्चस्व निर्माण करण्याच्या उद्देशाने केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाल्यानंतर सदर गुन्हयात मोक्का कायद्यातील कलमांचा अंर्तभाव करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासामध्ये २६ अटक आरोपी व ०३ पाहिजे आरोपी यांचे विरुध्द सबळ पुरावा प्राप्त करुन गुन्हे शाखा, मुंबई यांचेमार्फत दिनांक ०६/०१/२०२५ रोजी मा. विशेष मोक्का न्यायालय, कोर्ट क्र. ५७, सत्र न्यायालय, मुंबई येथे ४५९० पानांचे दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखेकडुन सुरु आहे.

-----o-----